महत्त्वाचे

घरात घुसून युवतीसोबत गैरवर्तन

अहमदनगर (प्रतिनिधी) – घरात घुसून युवतीसोबत लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन करून तिच्यासह आईला मारहाण केल्याची घटना नगर शहरात घडली. याप्रकरणी पीडित २३ वर्षीय युवतीने शनिवारी (२७ जुलै) दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात तरुणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल लॅमुवेल सावंत (वय २६ रा. सारसनगर, नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. विशाल हा त्याच्याकडील दुचाकीवरून फिर्यादी युवतीच्या घरी २० जुलै रोजी दुपारी अडीचच्या सुमारास आला. त्यावेळी युवती व तिची आई घरात होती. विशालने युवतीसोबत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. युवतीसह तिच्या आईला शिवीगाळ करून मारहाण केली. जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस अंमलदार बनकर अधिक तपास करत आहेत.

बालिकेचा पाण्याच्या हौदात पडून मृत्यू

अहमदनगर (प्रतिनिधी) – राहत्या घरासमोर असलेल्या पाण्याच्या हौदात पडून पाच वर्षीय बालिकेचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना नगर तालुक्यातील निंबळक येथे शुक्रवारी (२६ जुलै) घडली. माही केतन गजर (वय ५ रा. निंबळक) असे मृत पावलेल्या मुलीचे नाव आहे. माही ही राहत्या घरासमोर असलेल्या पाण्याच्या हौदात पडल्याने तिला नातेवाईक अतुल गजर यांनी खासगी वाहनाने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात आणले होते. जिल्हा शासकीय रूग्णालयातील डॉक्टरने उपचारापूर्वीच ती मयत झाली असल्याचे सांगितले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पोले यांनी पोलिसांना खबर दिली आहे. त्यावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार टेमकर करत आहेत.

आठ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड

अहमदनगर (प्रतिनिधी) – शहरातील राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या एन. एन. सथ्था औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील एकूण आठ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट ड्राईव्ह व कंपनी मुलाखतमध्ये निवड झाली. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंटने आयोजित केलेल्या फार्मा ई- सेल असोसिएट या पोस्टसाठी कलेक्ट केअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये नुकतेच पाच विद्यार्थ्यांची निवड झाली असताना विद्यालयातील आणखी तीन विद्यार्थ्यांची दोन नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाल्याची माहिती फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य विशाल पांडे यांनी दिली. चतुर्थ वर्ष बी फार्मसीचे विद्यार्थी कुणाल जगताप व रोहन लाड यांचे फ्रेसेनियस काबी व प्रदीप गोसावी याची मुरली कृष्णा फार्मा, पुणे येथे उत्तम पॅकेजवर निवड झाली. या मुलाखतीसाठी व विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पांडे, ट्रेनिंग प्लेसमेंट अधिकारी डॉ. जयप्रकाश सूर्यवंशी व प्रा. राजश्री सुंबे यांनी विशेष मेहनत घेतली. संस्थेचे सचिव विद्याधर काकडे, जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण बिटाळ, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. पांडे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

वीज तांत्रिक पतसंस्थेच्या चेअरमनपदी जावळे

अहमदनगर (प्रतिनिधी) – वीज क्षेत्रात अग्रगण्य असणारी वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाळासाहेब जावळे, व्हा. चेअरमनपदी सोमनाथ शिरसाठ व मानद सचिवपदी संतोष भिंगारदिवे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी इब्राहिम हवालदार, स्वाभिमानी मंडळाचे अध्यक्ष शंकर जारकड, रघुनाथ लाड, विजय ढवण, नंदकुमार मेहेत्रे, चंद्रकांत सुरवसे, मधुकरराव पाथरकर, विक्रम कोके, सचिन चोळके, अशोक आव्हाड आदी उपस्थित होते. यावेळी हवालदार म्हणाले, स्वाभिमानी मंडळाच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाच्या माध्यमातून पतसंस्थेचा पारदर्शक कारभार करून सभासद, ठेवीदार, कर्जदार यांचा विश्वास संपादन केला आहे. पतसंस्थेच्या कार्यात सर्वांचा सहभाग आसावा यासाठी प्रत्येकवर्षी संचालकांना चेअरमन, व्हा. चेअरमन, सचिव पदाची संधी देण्यात येत आहे. त्यामुळे प्रत्येक पदाधिकारी आपल्या कार्यकर्तृत्वाने पतसंस्थेच्या लौकिकात भरच पाडत आहेत. याप्रसंगी संचालक सचिन चोरगे, अरूण भोसले, किशोर काळे, संतोष शेलार, आशिष वेळापूरे, रूपेश चाकणे, सचिन सुडके, अरविंद पाठक, प्रवीण देशमुख, कृष्णा वायसे, सतिश भुजबळ, अशोक मते, उषा मिसाळ, सुनीता मेढे, तज्ञ संचालक प्रवीण जठार, व्यवस्थापक दिलीप घोडेचोर, वरिष्ठ लिपिक दीपक हुशारे आदी उपस्थित होते.

लग्न न केल्यास अल्पवयीन मुलीला गोळ्या घालण्याची धमकी

अहमदनगर (प्रतिनिधी) – नगर शहरातील उपनगरात एका शाळेत दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीस तरुणाने हात धरून माझ्यासोबत लग्न न केल्यास बंदुकीने गोळ्या घालून तुला व तुझ्या घरच्यांना जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. २५ जुलै रोजी दुपारी चार वाजता शाळेत ही घटना घडली. सचिन गोरक्षनाथ ससे (रा. जेऊर बायजाबाई, ता. नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २५ जुलै रोजी दुपारी चार वाजता मी वर्गात असताना सचिन ससे हा वर्गात आला. हात पकडून मला तुझ्यासोबत बोलायचे आहे. तू माझ्याबरोबर बाहेर चल असे म्हणून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तू माझ्यासोबत लग्न केले नाही तर तुझ्या लग्नात येऊन बंदुकीने गोळ्या घालून तुला व तुझ्या घरच्यांना जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. या घटनेचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक मुजावर करत आहेत.

मनपा ठेकेदार संघटनेच्या अध्यक्षपदी लोटके

अहमदनगर (प्रतिनिधी) – महानगरपालिका नोंदणीकृत ठेकेदार संघटनेची बैठक संपन्न झाली या बैठकीत अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा ठराव शाकीर शेख यांनी मांडून सर्व ठेकेदारांनी एकमताने मंजुरी देत ठराव मंजूर करून अध्यक्षपदी सचिन लोटके व उपाध्यक्षपदी शोएब शेख, ओमकार देशमुख, नाजीर शेख यांची निवड करण्यात आली. यावेळी राजेंद्र लोणकर, आनंद पुंड, अभिजीत काळे, मोईन खान, नितीन फुलसौंदर, अक्रम शेख, इमरान शेख, नंदू धाडगे आदीसह ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नूतन ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष लोटके म्हणाले, अहमदनगर महानगरपालिका नोंदणीकृत ठेकेदार संघटनेच्या ठेकेदारांना अनेक अडचणी येतात त्यामध्ये ठेकेदारांना वेळेवर बिल अदा होत नाही व बयाना रक्कम मिळणेबाबत सेक्युरिटी डिपॉझिट लायब्ररी प्रिंट कमी करणे, छाननी समिती लवकर करणे अशा विविध अडीअडचणींना सामना करावा लागत आहे. त्यामुळे पुढील काळात संघटनेच्यामार्फत ठेकेदारांना येणारी अडचण सोडवण्यासाठी अध्यक्ष या नात्याने कटिबद्ध राहणार असल्याची भावना व्यक्त केली.

धमकी देत दाजीचा अल्पवयीन मेहुणीवर वारंवार अत्याचार

गर्भपातही केला; पीडितेच्या फिर्यादीवरून पोलिसांत गुन्हा

अहमदनगर (प्रतिनिधी) – जीवे मारण्याची धमकी देऊन १७ वर्षीय अल्पवयीन मेहुणीवर दाजीने वारंवार अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. पीडिता गर्भवती राहिल्यानंतर तिला बळजबरीने गोळ्या खाऊ घालून तिचा गर्भपातही केला. नगर शहरात राहणाऱ्या पीडिताने दिलेल्या फिर्यादीवरून तिच्या दाजीविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात अत्याचार, बळजबरीने गर्भपात, पोस्को आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडिताने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ९ मे २०२३ रोजी बहिणीच्या डिलिव्हरी करता मी आणि माझी आई मनपाच्या कै. बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात गेलो होतो. रात्री साडेआठच्या सुमारास तेथे दाजी दारू पिऊन आले व मला जिन्या जवळ असलेल्या बोळीत घेऊन गेले. तेथे त्यांनी बळजबरीने शारीरिक संबंध केले तसेच कोणाला काही सांगितले तर मला आणि माझ्या आईला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर दोन महिन्यांनी मासिक पाळी न आल्याने त्याने मला गोळ्या आणून त्या खायला दिल्याने गर्भपात झाला. त्यानंतर २७ फेब्रुवारी २०२४ रोजी रात्रीच्या वेळी दाजीने बहिणीला मारहाण केली. माझी आई आणि बहीण तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेली असता, दाजी दारू पिऊन घरी आले. त्यांनी दोन वेळा बळजबरीने शरीर संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर २४ जुलै २०२४ रोजी सकाळी दहा वाजता दाजी म्हणाले की, आपण माझ्या गावी जाऊ, आम्ही दोघे दुचाकीवर बसून छत्रपती संभाजीनगर रस्त्याने शेंडी (ता. नगर) येथे गेलो. तुमचे गाव कुठे आहे असे त्याला विचारले असता त्याने दुचाकी डोंगराच्या कडेला उभी केली. माझे हातपाय बांधून बळजबरीने शारीरिक संबंध केले. कोणाला काही सांगितले तर मारून टाकीन, अशी धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक योगीता कोकाटे करत आहेत.

नेवाशाच्या युवकाला नगरच्या न्यायालयात मारहाण

कॉलेजमध्ये झालेल्या वादातून घडली घटना

अहमदनगर (प्रतिनिधी) – येथील न्यू लॉ कॉलेजमध्ये तीन महिन्यांपूर्वी झालेल्या भांडणाच्या रागातून दोघांनी एका युवकाला लाथाबुक्क्यांनी व लोखंडी फायटरने मारहाण करून जखमी केले. आकाश गोरक्षनाथ चव्हाण (वय २४ रा. चिंचबन, ता. नेवासा) असे मारहाण झालेल्या युवकाचे नाव आहे. येथील जिल्हा न्यायालयाच्या तळमजल्यावरील मोकळ्या जागेत ही घटना घडली.

जखमी आकाश यांनी येथील जिल्हा रूग्णालयात उपचार घेतल्यानंतर त्यांनी शनिवारी (२७ जुलै) दुपारी दिलेल्या फिर्यादीवरून मारहाण करणाऱ्या दोघा संशयितांविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हेमंत जगदीश पालवे (रा. सावेडी, नगर) व अभी गागरे (पूर्ण नाव, पत्ता नाही) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

आकाश यांच्यासोबत मागील तीन महिन्यापूर्वी येथील न्यू लॉ कॉलेजमध्ये हेमंत पालवे व अभी गागरे यांचे वाद झाले होते. २३ जुलै रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आकाश हे येथील जिल्हा न्यायालयाच्या तळमजल्यावरील मोकळ्या जागेत असताना हेमंत व अभी यांनी तीन महिन्यांपूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून आकाश यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. लाथाबुक्क्यांनी व लोखंडी फायटरने मारहाण करून जखमी केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार पी. ए. बारगजे करत आहेत.

ताण कमी करण्यासाठीच लोकन्यायालयाची गरज

न्यायाधीश भालेराव; तडजोडीने अनेक प्रकरणे निकाली

अहमदनगर (प्रतिनिधी) – दैनंदिन न्यायालयासमोरील वाढत्या प्रकरणांचा ताण कमी करण्यासाठी लोकन्यायालय काळाची गरज बनली आहे. लोकन्यायालयात समोपचाराने प्रकरणे निकाली काढून न्याय देण्याचा प्रयत्न केला जात असल्याची भावना कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमती संगीता ना. भालेराव यांनी व्यक्त केली.

येथील कौटुंबिक व कामगार न्यायालयात शनिवारी (२७ जुलै) लोकन्यायालयात औद्योगिक न्यायालयातील २७ पैकी २६ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर कौटुंबिक न्यायालयातील प्रकरणे देखील समोपचाराने सोडविण्यात आली. या लोक न्यायालयाचे उद्घाटन न्यायमुर्ती राम शास्त्री प्रभुणे यांच्या पुतळ्यास कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश भालेराव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी न्यायाधीश मनिषा द. चराटे- हंपे, न्यायाधीश बी. एस. लखोटे, अभिजीत देशमुख, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष तथा विशेष सरकारी वकील सुरेश लगड, सचिव ॲड. राजेश कावरे, प्रभारी प्रबंधक सुधीर काकडे, धीरज नारखेडे, शेखर मेहेत्रे, अविनाश सूर्यवंशी, रंगनाथ गवळी, गजानन देशमुख, मुकरम शेख, कविता बारेला, अशोक राहिंज, संतोष अळकुटे, महिला पोलीस अंमलदार भगत, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. अशोक पाटील, ॲड. कल्याण पागर, ॲड. मनीषा केळगंद्रे, ॲड. अशोक गुंड, ॲड. दीपक चंगेडे, ॲड. बी. आर. शेलार, ॲड. जयेश आमले, एस. बी. राऊत, ए. पी. झिंजे आदी उपस्थित होते.

महिलेच्या गळ्यातील दीड तोळ्याची चेन ओरबाडली

भुतकरवाडी परिसरातील घटना; तोफखाना पोलिसांत गुन्हा

अहमदनगर (प्रतिनिधी) – भुतकरवाडी परिसरातील महादेव मंदिरात दर्शन करून घराकडे पायी जात असलेल्या वृध्द महिलेच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची चेन दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी बळजबरीने ओरबाडून नेली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अंजली अनिल धोडपकर (वय ६५ रा. श्री हौसिंग सोसायटी, भूतकरवाडी) यांनी फिर्याद दिली आहे.

अंजली शुक्रवारी (२६ जुलै) सायंकाळी त्यांच्या घरापासून जवळच असलेल्या महादेव मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. मंदिरात दर्शन घेतल्यानंतर त्या घरी पायी जात असताना दुचाकीवरून तोंडाला रूमाल बांधलेले दोन इसम त्यांच्या जवळ आले. काही कळायच्या आत त्यांनी अंजली यांच्या गळ्यातील ४५ हजार रुपये किमतीची दीड तोळ्याची सोन्याची चेन बळजबरीने ओरबाडून मनमाड रस्त्यावरील दीपक पेट्रोल पंपाच्या दिशेने धूम ठोकली. घटनेनंतर अंजली यांनी आरडाओरडा केला असता घटनास्थळी गर्दी जमा झाली. तोफखाना पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अंजली यांनी शनिवारी (२७ जुलै) दुपारी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे अधिक तपास करत आहेत. दरम्यान, नातीसाठी चॉकलेट आणण्याकरिता मैत्रिणीसोबत गेलेल्या महिलेच्या गळ्यातील मिनी गंठण बळजबरीने हिसकावून नेल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी पाईपलाईन रस्त्यावर घडली होती. दोन्ही ठिकाणी चोरी करणारे चोरटे एकच असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्या दृष्टीकोनातून पोलीस तपास करत आहेत.

सावेडीतील 'त्या' अवैध गॅस रिफीलिंग सेंटरवर पुन्हा छापा

अहमदनगर (प्रतिनिधी) – सावेडी सोनानगर चौकात अवैधरित्या सुरू असलेल्या गॅस रिफीलिंग सेंटरवर तोफखाना पोलिसांनी शनिवारी छापा टाकून कारवाई केली. याप्रकरणी सनी शिंदे (वय २३ रा. वैदूवाडी, सावेडी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार सतीश भवर यांनी फिर्याद दिली आहे.

सावेडी भिस्तबाग ते कुष्ठधाम रस्त्यावर सोनानगर चौकात एका पत्र्याच्या शेडमध्ये अवैधरित्या गॅस रिफीलिंग सेंटर सुरू असल्याची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या पथकाने शनिवारी सदर सेंटरवर छापा टाकला. त्यावेळी ताब्यातून गॅस रिफीलिंग मशीन, भारत गॅस कंपनीच्या सात टाक्या, इलेक्ट्रॉनिक लोखंडी प्लेट असलेला वजन काटा, रिक्षा (एमएच १६ बीसी ०६०३) असा एक लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शिंदे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, शिंदे याच्या अवैध गॅस रिफीलिंग सेंटरवर यापूर्वी पोलीस व पुरवठा विभागाने कारवाई केली आहे. कारवाई करून देखील तो त्या ठिकाणी गॅस रिफीलिंग सेंटर चालवित आहे.

सिंगल युज प्लास्टिक वापरणाऱ्यांवर मनपाकडून कारवाई सुरु

प्रोफेसर चौकात पाच आस्थापनांना २५ हजारांचा दंड

अहमदनगर (प्रतिनिधी) – सिंगल युज प्लास्टिक संदर्भात महानगरपालिकेकडून पुन्हा एकदा कारवाईला सुरूवात करण्यात आली आहे. सावेडी उपनगर परिसरातील प्रोफेसर कॉलनी चौक येथे हॉटेल्स व दुकाने अशा पाच आस्थापनांना महापालिकेकडून २५ हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे. शहरात सध्या केंद्र शासनाच्या सूचनेनुसार 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियान राबवले जात आहे. या अंतर्गत ही कारवाई करण्यात आल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली.

आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत हरितकचरा उचलणे, प्लास्टिक बंदीची शंभर टक्के अंमलबजावणी करून प्लास्टिकचा कचरा कमी करणे, यासह आरोग्य विषयक उपाययोजना करण्यात येत आहेत. या अंतर्गत महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रोफेसर कॉलनी चौकातील दुकाने, हॉटेल्सची तपासणी केली. यात प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्या रूचिरा स्वीट्स, हॉट चिप्स, अक्किज बर्गर कॅफे, बॉम्बे ग्रिल कॅफे, जाधव वडेवाले या पाच आस्थापनांना प्रत्येकी ५ हजार रुपये याप्रमाणे २५ हजार रुपये दंड करण्यात आला. तसेच १५ किलो प्लास्टिकही जप्त करण्यात आले. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत स्वच्छता निरीक्षक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.

दर रविवारी सकाळी १ तास घर व कॉलनीमध्ये स्वच्छता मोहीम राबवून पाणी साचणाऱ्या ठिकाणी उपाययोजना करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. या सर्व अभियानात व मोहिमेत नागरिकांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न आहे. नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, आपले शहर स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी, आपल्या कुटुंबाला साथीच्या आजारांपासून दूर ठेवण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोनातून सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी केले आहे.

यशस्वी जीवनासाठी तडजोड आवश्यक : न्यायाधीश यार्लगड्डा

अहमदनगर (प्रतिनिधी) – जीवन एक तडजोड आहे. प्रत्येकाने आयुष्यात तडजोड केली पाहिजे. जास्तीत जास्त प्रकरणे आपापसात तडजोड करून मिटविले पाहिजे. लोक अदालतमध्ये ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, महसूल आणि वीज वितरण, बँका पतसंस्था, इन्शुरन्स कंपनी सहभागी होत असतात म्हणून हा एक महायज्ञ असून त्यामध्ये प्रत्येकाने आपआपले योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर बार असोसिएशन आणि सेंट्रल बार असोसिएशनतर्फे शनिवारी (२७ जुलै) आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन न्यायाधीश यार्लगड्डा यांच्याहस्ते झाले. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, बार असोसिएशनचे अध्यक्ष नरेश गुगळे, पोलीस उपअधीक्षक हरीष खेडकर, ॲड. भूषण बऱ्हाटे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. सागर पादीर, ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड. पिंटू पाटोळे, ॲड. अंधारे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव भाग्यश्री पाटील आदी उपस्थित होते. ॲड. गुगळे म्हणाले, जी प्रकरणे समोपचाराने मिटवण्यासारखे आहेत, ती प्रकरणे लोक अदालतमध्ये मिटवावीत. सामान्य लोकांनी वेळ व दिवस वाया न घालवता ही प्रकरणे जास्तीत जास्त मिटवून त्याचा फायदा घ्यावा, असे आवाहन केले.

अश्लिल चाळे सुरू असलेल्या कॅफेवर छापेमारी

तोफखाना पोलिसांची सावेडीत कारवाई

अहमदनगर (प्रतिनिधी) – कॅफे शॉपच्या नावाखाली मुला-मुलींना अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या सावेडी उपनगरातील तीन कॅफेंवर तोफखाना पोलिसांनी शुक्रवारी व शनिवारी कारवाई केली. अश्लिल चाळे करणाऱ्या मुला- मुलींना पकडून समज देऊन सोडून देण्यात आले तर कॅफे मालकांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कॅफे शॉपच्या नावाखाली मुला-मुलींना अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे प्रमाण सावेडी उपनगरात वाढले आहे. अशा कॅफे शॉपचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पथकाला दिले होते. पथकाने शुक्रवारी सायंकाळी सावेडीतील पंपिंग स्टेशन रस्त्यावरील ताठेनगर येथील गोल्ड स्टार कॅफेवर छापा टाकला. कॅफेचा मालक ओंकार कैलास ताठे (वय २३, रा. ताठेनगर, सावेडी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. बालिकाश्रम रस्त्यावरील ऑरेंज कॅफेवर पोलिसांनी शनिवारी दुपारी कारवाई केली. या कॅफेचा मालक अविनाश विलास ताठे (वय ३० रा. ताठेनगर, सावेडी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. तर दिल्लीगेट परिसरातील सायबर सिटीच्या पाठीमागे लाईफलाईन कॅफेवरही पोलिसांनी शनिवारी दुपारी कारवाई केली. या कॅफेचा मालक मंगेश गोरख कोळगे (वय २४ रा. चास रस्ता, अकोळनेर, ता. नगर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या तिन्ही कॅफेत मुले व मुली अश्लिल चाळे करताना मिळून आली होती. त्यांना समज देऊन सोडून देण्यात आले आहे. तसेच पाईपलाईन रस्त्यावरील श्रध्दा एनक्लेव्ह नावाच्या इमारतीत निरवाना फॅमिली सलोन ॲण्ड स्पा नावाचे सलोनमध्ये पुरूष व महिलांना अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आल्याचा प्रकार पोलिसांच्या छाप्यातून समोर आला आहे. या सलोनचा मालक राहुल चंद्रकांत बागल (वय ३७ रा. ठाणे वेस्ट, हल्ली रा. पाईपलाईन रस्ता, एकविरा चौक, सावेडी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभियानाद्वारे डेंग्यू मुक्तीबाबत जनजागृती

केडगाव उपनगरात मनपाकडून एक तास स्वच्छतेचा उपक्रम

अहमदनगर (प्रतिनिधी) – झिंका, डेंग्यू आदी विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी एक तास स्वच्छतेचा हा उपक्रम दर रविवारी राबवण्यासाठी नागरिकांना आवाहन केले होते. त्यानुसार महापालिकेच्यावतीने केडगाव उपनगरामध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

यावेळी महापालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे म्हणाले, झिंका, डेंग्यू यासारख्या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपला परिसर स्वच्छ ठेवून डास उत्पत्ती करणारी स्थाने नष्ट करणे आवश्यक आहे. एड्स डास हा आपल्या परिसरात स्वच्छ पाण्यात वाढत असल्याने आपल्या जवळपास कोणत्याही प्रकारचे पाणी साचू देऊ नये. पाणी वाहते करून डास उत्पत्ती करणारी स्थाने नष्ट केल्यास विषाणूजन्य आजारांना रोखता येईल. त्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्न करीत आहे. यामध्ये नागरिकांचा सहभाग देखील महत्त्वाचा असल्याचे ते म्हणाले. महापालिका आरोग्य विभागाने आयोजित केलेल्या या जनजागृती कार्यक्रमास केडगाव उपनगरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपापल्या परिसरातील डास उत्पत्ती निर्माण करणारी स्थाने नष्ट केली. केडगाव आरोग्य केंद्राचे कर्मचारी, आशा सेविकांसह घरोघरी जाऊन डेंग्यू, हिवताप, चिकनगुनिया या आजारांबद्दल माहिती दिली. त्यावेळी अनेक महिला, नागरिक यांनी सहकार्याची भावना व्यक्त केली.

आदर्शगाव हिवरे बाजारमधील माजी विद्यार्थी २२ वर्षांनंतर आले एकत्र

अहमदनगर (प्रतिनिधी) – २२ वर्षांनंतर हिवरेबाजारमध्ये यशवंत विद्यालयात शैक्षणिक वर्ष २००४ ते २००७ मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा झाला. या स्नेहमेळाव्यास पद्मश्री डॉ.पोपटराव पवार, सरपंच विमल ठाणगे, सहदेव पवार, चिमाजी गोहड, वसंत कर्डिले, छबुराव ठाणगे आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी पद्मश्री डॉ. पवार होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांकडून उपस्थित गुरूजनांचा सन्मान करण्यात आला व भेटवस्तू देण्यात आली. तर २००६ बॅचमधील डॉ. सुशील पादीर, पंकज ठाणगे, पवन ठाणगे, नंदलाल ठाणगे तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. स्वागत सोहळ्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने आपापली ओळख करून दिली व मनोगत व्यक्त केले. मनोगतात प्रत्येकाने माध्यमिक शाळेतील आपापले अनुभव कथन केले. तसेच शिक्षकांविषयीच्याही आठवणी सांगितल्या. शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम या विषयांवर गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला.